मुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य
कोंकण भवन, नवी मुंबई-४००६१४.
12 MAR 2009
आवक क्र.: सं ११८

**लेखा व कोषागारे संचालनालय व स्थानिक निधी लेखा विभागातील गट-क सेवेच्या सेवाप्रवेश नियमांच्या अंमलबजावणी बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक :क्र.सेवाप्र-११.०७/प्र.क्र.१९६/कोषा-(प्र-३),
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :२ मार्च, २००९.

वाचा :
१. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.डीएटी-१०६२/१८४-एसपीएल/XII, दिनांक १६ एप्रिल,१९६३.
२. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.डीएटी-१०६३/४९८/६३/XII, दिनांक ७ मे, १९६३.
३. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.डीएटी-१०६४/१६४९/६४/XII, दिनांक १५ जून, १९६४.
४. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.डीएटी-१०६३/२४६७/६३/XII, दिनांक १९ जून, १९६३.
५. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.डीएटी-१०६५/२६६०/६५/XII, दिनांक १८ जून, १९६५.
६. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.डीएटी-१०७०/४२१९/७०/XII, दिनांक १४ सप्टेंबर, १९७०.
७. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.डीएटी-१०७०/५५४२/७०-XII,दिनांक १३ जानेवारी, १९७१.
८. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.डीएटी-१२७१/२९८३/७१/ए-४, दिनांक १० ऑगस्ट, १९७३.
९. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.एमआयएस-१०८०/सीआर-३७७३/८०/प्रशासन-१४, दिनांक १७ जानेवारी, १९८६.

**<u>प्रस्तावना :</u>**

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : एमएएस-१९६१/१२७९१-XV, दिनांक २७ डिसेंबर, १९६१ अनुसार दिनांक ०१ जानेवारी, १९६२ पासून लेखा व कोषागारे संचालनालयाची स्थापना करण्यात आली. लेखा व कोषागारे संचालनालयाच्या अधिपत्याखाली विभागीय कार्यालये, अधिदान व लेखा कार्यालय व कोषागार कार्यालये कार्यरत आहेत. स्थानिक निधी लेखा विभागात मुख्य लेखा परीक्षक, सहमुख्य लेखा परीक्षक/ उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ) व उपमुख्य लेखा परीक्षक यांची कार्यालये कार्यरत आहेत. या कार्यालयांमधील गट-क मधील समान वेतनश्रेणीमधील संवर्गांचे सेवाभरती नियम भिन्न आहेत. तसेच या कार्यालयांतील काही संवर्ग जिल्हास्तरीय, काही विभागस्तरीय तर काही राज्यस्तरीय आहेत. लेखा व कोषागारे संचालनालयाच्या तसेच स्थानिक निधी लेखा विभागाच्या कामाच्या स्वरुपात झालेले परिवर्तन, वाढलेली व्याप्ती, नवीन तंत्रज्ञानाचा वापर व काळानुरुप बदल करण्याची आवश्यकता यांचा विचार करुन उपरोक्त नमूद सर्व कार्यालयातील संवर्गांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये एकवाक्यता आणण्यासाठी लेखा व कोषागारे गट-क सेवा (सेवाप्रवेश) नियम, २००८ व स्थानिक निधी लेखा गट-क सेवा (सेवाप्रवेश) नियम, २००८ असे नवीन सेवाप्रवेश नियम दिनांक ०२ डिसेंबर, २००८ पासून अस्तित्वात आलेले आहेत. सध्या उपरोक्त कार्यालयांमध्ये अस्तित्वात असलेल्या सेवाप्रवेश नियमांप्रमाणे कार्यरत असलेले कर्मचारी व नव्या नियमांप्रमाणे भरती होणारे कर्मचारी यांच्यामध्ये सेवाविषयक अडचणी निर्माण होऊ नयेत यासाठी काही तरतूदी करणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**<u>शासन निर्णय :</u>**

१. वित्त विभाग, शासन अधिसूचना क्रमांक : सेवाप्र-११.०७/प्र.क्र.१९६/१/कोषा (प्रशा-३), दिनांक ०२ डिसेंबर, २००८ व सेवाप्र-११.०७/प्र.क्र.१९६/२/कोषा (प्रशा-३), दिनांक ०२ डिसेंबर, २००८ अन्वये लेखा व कोषागारे संचालनालय व स्थानिक निधी लेखा विभाग या अंतर्गत पदांसाठी अनुक्रमे लेखा व कोषागारे गट-क सेवा व स्थानिक निधी लेखा गट-क सेवा स्थापित होऊन प्रादेशिक संवर्ग निर्माण करण्यात आले आहेत. यास्तव सोबतच्या परिशिष्ट- एक मध्ये जुन्या संवर्गांच्या समकक्ष नव्याने निर्माण करण्यात आलेले संवर्ग

दर्शविण्यात आले आहेत. यापुढे रिक्त होणारी पदे ही नवीन संवर्गासाठी उपलब्ध झाल्याचे मानण्यात येईल व नवीन सेवा प्रवेश नियमानुसार ती भरण्यात येतील.

२. जुन्या संवर्गातील पदांवर सध्या कार्यरत कर्मचाऱ्यांना पदोन्नती व अन्य सेवाविषयक बाबींसाठी त्या त्या पदांसाठी विहित असलेले या पूर्वीचेच नियम लागू राहतील. मात्र नवीन संवर्ग अस्तित्वात येण्यापूर्वी कार्यरत असलेले कर्मचारी दि.२ डिसेंबर, २००८ या दिवशी समरुप नवीन संवर्गात दाखल झाल्याचे मानण्यात (deemed) येईल.

३. नवीन संवर्गात दाखल झाल्यामुळे जुन्या संवर्गातील कर्मचा-यांचा नियमित पदोन्नतीचा तसेच प्रथम नियुक्तीचा दिनांक हा सेवाज्येष्ठतेसाठी विचारात घेण्यात येईल.

४. अ) सेवाप्रवेशोत्तर (मिनिस्टेरियल) परीक्षेऐवजी या पुढे 'महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट-क विभागीय परीक्षा भाग-एक' ही परीक्षा घेण्यात येईल.

ब) महाराष्ट्र लेखा लिपिक परीक्षेऐवजी यापुढे 'महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट-क विभागीय परीक्षा भाग-एक व भाग-दोन' ही परीक्षा घेण्यात येईल.

क) जुन्या संवर्गातील कर्मचाऱ्यांना लागू असलेली सेवाप्रवेशोत्तर किंवा महाराष्ट्र लेखा लिपिक परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्यांना सध्याच्याच अभ्यासक्रमाप्रमाणे दोन संधी देण्यात येतील. या दोन संधीत ते उत्तीर्ण न झाल्यास वर 'अ' व 'ब' मध्ये नमूद केल्याप्रमाणे परीक्षा त्यांना उत्तीर्ण व्हावी लागेल.

ड) वर नमूद दोन संधी देतांना ज्यावेळी जुन्या व नव्या संवर्गातील कर्मचा-यांसाठी एकाचवेळी परीक्षा घेण्यात येतील अशा वेळी जुन्या संवर्गातील उत्तीर्ण कर्मचारी नवीन संवर्गातील उत्तीर्ण कर्मचा-यांना परीक्षा वर्षानुसार ज्येष्ठ राहतील.

५. सेवाप्रवेशोत्तर परीक्षा व महाराष्ट्र लेखा लिपिक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा सूट मिळालेल्या जुन्या संवर्गातील कर्मचाऱ्यास नव्या संवर्गासाठी विहित केलेल्या या परीक्षेचा अनुक्रमे भाग-एक व भाग-दोन उत्तीर्ण होण्याची आवश्यकता नसेल.

६. अ) लेखा व कोषागारे गट-क सेवांतर्गत वरिष्ठ लेखापाल, कनिष्ठ लेखापाल आणि लेखा लिपिक या पदांसाठी प्रादेशिक सहसंचालक/ उपसंचालक, लेखा व कोषागारे हे नियुक्ती प्राधिकारी असतील.

ब) स्थानिक निधी लेखा गट-क सेवांतर्गत वरिष्ठ लेखापरीक्षक, कनिष्ठ लेखापरीक्षक व लेखापरीक्षा लिपिक या पदांसाठी प्रादेशिक सहमुख्य लेखापरीक्षक / उपमुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ) हे नियुक्ती प्राधिकारी असतील.

७. कार्यालय प्रमुखाच्या नियंत्रणाखाली असलेल्या पदांवर काम करणाऱ्या जुन्या संवर्गातील व नव्या संवर्गातील कर्मचाऱ्यांची प्रशासकीय गरजेनुसार कार्यालयांतर्गत बदली करण्याचे अधिकार त्या त्या कार्यालय प्रमुखास असतील.

८. लेखा व कोषागारे गट-क सेवा यामधील सरळसेवेची प्रादेशिक संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता पुढे नमूद केल्याप्रमाणे प्रादेशिक निवड समिती स्थापित करण्यात येत आहे.

**अ) लेखा व कोषागारे गट-क सेवा**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष | : | प्रादेशिक सह संचालक / उपसंचालक, लेखा व कोषागारे |
| २. | सदस्य | : | अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / इतर मागासवर्गीय या प्रवर्गातील गट-अ मधील अधिकारी |
| ३. | सदस्य | : | गट-अ मधील अल्पसंख्याक अधिकारी |
| ४. | सदस्य | : | सर्वसाधारण प्रवर्गातील गट-अ अधिकारी |

उक्त निवड समितीमध्ये सर्वसाधारण प्रवर्ग किंवा उपरोक्त प्रवर्गापैकी कोणत्याही प्रवर्गातील एक प्रतिनिधी महिला असणे अनिवार्य असेल.

प्रादेशिक सहसंचालक/उपसंचालक उपलब्ध नसतील तेव्हा संचालक निर्देशित करतील असा सहसंचालक /उपसंचालक प्रादेशिक निवडसमितीचे काम पाहील.

स्थानिक निधी लेखा गट-क सेवा यामधील सरळसेवेची प्रादेशिक संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता पुढे नमूद केल्याप्रमाणे प्रादेशिक निवड समिती स्थापित करण्यात येत आहे.

**ब) स्थानिक निधी लेखा गट-क सेवा**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष | : | प्रादेशिक सह मुख्य लेखापरीक्षक /उपमुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ) स्थानिक निधी लेखा |
| २. | सदस्य | : | अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / इतर मागासवर्गीय या प्रवर्गातील गट-अ मधील अधिकारी |
| ३. | सदस्य | : | गट-अ मधील अल्पसंख्याक अधिकारी |
| ४. | सदस्य | : | सर्वसाधारण प्रवर्गातील गट-अ अधिकारी |

उक्त निवड समितीमध्ये सर्वसाधारण प्रवर्ग किंवा उपरोक्त प्रवर्गापैकी कोणत्याही प्रवर्गातील एक प्रतिनिधी महिला असणे अनिवार्य असेल.

प्रादेशिक सह मुख्य लेखापरीक्षक / उपमुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ) उपलब्ध नसतील तेव्हा मुख्य लेखापरीक्षक निर्देशित करतील असा सह मुख्य लेखापरीक्षक / उपमुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ) प्रादेशिक निवडसमितीचे काम पाहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(नि.बा. वाडेकर)
उप सचिव वित्त विभाग.

प्रत

राज्यपाल यांचे सचिव
मुख्य सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग
संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधि लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी , मुंबई
सर्व विभागीय सह/उपसंचालक, लेखा व कोषागारे
सर्व सहमुख्य लेखापरीक्षक /उपमुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधि लेखा
सर्व उपमुख्य लेखापरीक्षक (कनिष्ठ), स्थानिक निधि लेखा
सर्व कोषागार अधिकारी
कार्यासन अधिकारी, कार्यासन-१२, सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
निवड नस्ती ( कोषा. प्रशा. ३ )

**शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक :क्र.सेवाप्र-११.०७/प्र.क्र.१९६/कोषा-(प्र-३),**
**दिनांक:२ मार्च , २००९ चे सहपत्र**

**परिशिष्ट-एक**

लेखा व कोषागारे संचालनालय व स्थानिक निधी लेखा विभाग या अंतर्गत अस्तंगत होणारे व नव्याने निर्माण केलेले संवर्ग दर्शविणारे विवरणपत्र.

## लेखा व कोषागारे संचालनालय

| अ.क्र. | कार्यालय | अस्तंगत होणारा संवर्ग | | नव्याने निर्माण केलेला समकक्ष संवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | संचालनालय, लेखा व कोषागारे / विभागीय सह /उपसंचालक, लेखा व कोषागारे | १ | कनिष्ठ लिपिक / लिपीक-टंकलेखक / रोखपाल | लेखा लिपीक |
| | | २ | वरिष्ठ लिपीक / टिप्पणी सहायक / संग्रह पडताळक/ रोखपाल | कनिष्ठ लेखापाल |
| | | ३ | सहायक अधीक्षक / सहायक भांडार निरीक्षक / उपलेखापाल | वरिष्ठ लेखापाल |
| २ | अधिदान व लेखा कार्यालय | १ | लिपीक-टंकलेखक / निम्नस्तर लिपीक | लेखा लिपीक |
| | | २ | उच्चस्तर लिपीक | कनिष्ठ लेखापाल |
| | | ३ | निवडश्रेणी लिपीक/ उपलेखापाल | वरिष्ठ लेखापाल |
| ३ | कोषागार कार्यालय | १ | लिपीक-टंकलेखक / रोखपाल | लेखा लिपीक |
| | | २ | वरिष्ठ लिपीक/ मुद्रांक प्रमुख लिपीक | कनिष्ठ लेखापाल |
| | | ३ | उपकोषागार अधिकारी (निम्नस्तर) / उपलेखापाल | वरिष्ठ लेखापाल |

## स्थानिक निधी लेखा

| अ.क्र. | कार्यालय | अस्तंगत होणारा संवर्ग | | नव्याने निर्माण केलेला समकक्ष संवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्य लेखा परीक्षक/ विभागीय सहमुख्य लेखा परीक्षक/ उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ)/ उपमुख्य लेखा परीक्षक | १ | कनिष्ठ लिपिक / लिपीक-टंकलेखक | लेखापरीक्षा लिपीक |
| | | २ | उच्चस्तर लिपीक/ कनिष्ठ लेखापरीक्षक/ जिल्हा ग्रामपंचायत दुय्यम लेखापरीक्षक | कनिष्ठ लेखापरीक्षक |
| | | ३ | सहायक अधीक्षक/ निवडश्रेणी लिपीक/ जिल्हा ग्रामपंचायत लेखापरीक्षक श्रेणी-२ | वरिष्ठ लेखापरीक्षक |